# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/12/2023 (सोमवार) सकाळ

## कन्हान येथील सराईत गुन्हेगार बल्लन शामलाल गोस्वामी याला

## MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणाऱ्या खदान नं. ०६, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार बल्लन शामलाल गोस्वामी वय ३१ वर्ष, रा. खदान नं. ०६, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर हा मागील ०५ वर्षापासून कन्हान परिसरात गुंडगिरी करुन अवैध प्राणघातक शस्त्र बाळगुन शरीराविरूद्ध व मालमत्तेविरूद्ध गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले होते. परंतु बल्लन याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली होती. परंतु बल्लन याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. बल्लन याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. १६/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सराईत गुन्हेगार बल्लन शामलाल गोस्वामी याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढुन त्यास दिनांक १८/१२/२०२३ रोजी ०१ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर